**उलटतपास प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्री.एच.पी.तरवडकर यांच्यामार्फत**

**शपथेवर**

**१५.** मी दावा मिळकतीचा सन १९५६-५७ पासूनचा सातबारा व त्या अनुषंगे झालेले फेरफार पाहिलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की फेरफार क्र. ११७९३ ने दावा मिळकतीत एसआर १२२ दि. १८/१२/१९७१ प्रमाणे कुळ म्हणून कानोजी धोंडू वाक्कर यांचे नाव व मालक म्हणून मुकुंद शंकर सारंग यांचे नाव दाखल झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की फेरफार क्र. ११७९३ मी अपिल दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की मालवण येथील तहसिलदार यांच्या कार्यालयात मी कुळवहिवाट दावा क्र. २१/२०१४ दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की सदर दाव्यात मी मुकुंद शंकर सारंग यांना सामनेवाला क्र. ३ म्हणून समाविष्ट केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की त्यांनी दि. १७/०८/२०१५ रोजी त्यांचे सदर कुळवहिवाट दाव्यास म्हणणे दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादींनी त्यांच्या मालकीचे ११ गुंठे क्षेत्र कक्षा कांचन खराडे हिला नोंदणीकृत खरेदीखताने विक्री केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की सन १९५६-५७ च्या दावा मिळकतीच्या सातबारास ११ गुंठे क्षेत्रासाठी प्रतिवादींचे नाव दाखल झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की कृष्णा वासुदेव पाटकर यांचे २ गुंठे क्षेत्रासाठी नाव दाखल झालेले आहे.

**१६.** हे म्हणणे खरे नाही की मी प्रस्तुत दावा खोटा व खोडसाळ दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकतीपैकी ११ गुंठे क्षेत्रासाठी प्रतिवादींची पुर्ण वहिवाट आहे. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकतीत माझी वहिवाट आहे हे दाखविण्यासाठी मी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by Bhanupratap Basantsingh Chouhan
Date: 2019.10.07 16:23:32 +0530

दि. ०७/१०/२०१९ भानुप्रताप ब. चौहान

मालवण दिवाणी न्यायालय क.स्तर